सुधारणा

१. क. १३३अ हे सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, क. २ अन्वये दाखल करण्यात आले.

## पाणीपट्टी व साफसफाई कर यासंबंधी विशेष तरतुदी

**१३४. पुरवलेल्या पाण्याबद्दल कराऐवजी ठरावीक आकार व प्रदानांसाठी करार.–**

(१) आयुक्तास -

(अ) स्थायी समिती सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत, पाणीपट्टी देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही जागांच्या संबंधात पाणीपट्टी बसवण्याऐवजी अशा जागांना पुरवलेल्या पाण्याबद्दल, मोजणी करून याबाबत उक्त समितीकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा दराने किंवा नगरपालिकेच्या मुख्य नळास जोडलेल्या नळाचा आकार व ज्या प्रयोजनासाठी पाणी पुरवण्यात आले ते प्रयोजन यानुसार, महानगरपालिकेकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा दरांनी आकार घेता येईल.

(ब) स्थायी समिती सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत, कोणत्याही जागेला पाच वर्षांहून अधिक नसलेल्या एक किंवा अधिक वर्षांच्या नवीकरणयोग्य मुदतीसाठी उक्त जागांच्या बाबतीत अशा व्यक्तीकडून अन्यथा जी पाणीपट्टी किंवा मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून जो आकार वसूल करता आला असता त्याऐवजी एक ठरावीक नियतकालिक रक्कम दिल्यावर पाणी पुरवण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीबरोबर तडजोड करता येईल.

(२) आयुक्त, पोटकलम (१), खंड (अ) अन्वये मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून, पाण्याबद्दल आकार घेईल अशा प्रकरणांसाठी, स्थायी समितीस, मीटर नादुरुस्त असेल किंवा त्याची दुरुस्ती चालू असेल तेव्हा, पाण्याच्या वापरासंबंधी किंवा वापरलेल्या पाण्याबद्दल द्यावयाच्या आकारासंबंधी तिला योग्य वाटतील अशा शर्ती वेळोवेळी विहित करता येतील: आणि उक्त कलमाच्या खंड (ब) अन्वये तडजोड करण्यात आली असेल अशा प्रकरणांसाठी, उक्त समितीस पाण्याच्या वापरासंबंधी तिला योग्य वाटतील अशा शर्ती विहित करता येतील.

परंतु, या पोट-कलमान्वये विहित करण्यात आलेलो कोणतीही शर्त या अधिनियमाशी किंवा नियमांशी किंवा उपविधींशी विसंगत असता कामा नये.

(३) मोजणी करून किंवा नळाच्या आकारावरून पाण्याबद्दल ज्या व्यक्तीकडून आकार घेण्यात येत असेल किंवा ठरावीक नियतकालिक रक्कम देण्याबाबत ज्या व्यक्तीने तडजोड केली असेल ती व्यक्ती, पाणीपट्टी देण्यास पात्र असणार नाही. परंतु, पाण्याबद्दल तिने देय असलेली कोणतीही रक्कम, ती ज्या तारखेस देय होत असेल त्या तारखेस भरली नाही तर, ती जणू काही पाणीपट्टीची थकबाकी असल्याप्रमाणे आयुक्तास वसूल करता येईल.